# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)

## (ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि भारत मौसम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने)

**फोन नं.: (०२३५८) २८२३८७** **ई-मेल: dpl.amfu@gmail.com**

**अंक ३२/२०२१** **दिनांक २०/०४/२०२१** **कालावधी ५ दिवस**

**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०

| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १४/०४/२०२१ ते २०/०४/२०२१)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक २१/०४/२०२१ सकाळी ८:३० पासून २५/०४/२०२१ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (स्त्रोत: हवामान वेधशाळा, ठाणे) | | | | | | | | (स्त्रोत: प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई) | | | | |
| **१४/०४** | **१५/०४** | **१६/०४** | **१७/०४** | **१८/०४** | **१९/०४** | **२०/०४** | | **२१/०४** | **२२/०४** | **२३/०४** | **२४/०४** | **२५/०४** |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३५.० | ३४.० | - | ३४.० | ३४.२ | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३५ | ३६ | ३६ | ३६ | ३६ |
| २२.२ | २१.० | २२.० | २१.० | २०.२ | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २० | २१ | २१ | २२ | २२ |
| निरभ्र | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ७० | ७२ | ७१ | ६३ | ६२ | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ७३ | ६४ | ६३ | ७० | ६६ |
| ५२ | ४१ | - | ४४ | ४० | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ६० | ५८ | ५५ | ५६ | ५५ |
| ३.७ | ०.० | ३.७ | १.९ | ०.० | - | - | **वाऱ्याचा वेग(किमी/तास)** | ४ | ४ | ४ | ५ | ४ |
| नै. | शांत | नै. | नै. | शांत | - | - | **वाऱ्याची दिशा** | नै. | नै.द. | आ.पू. | द. | द. |

## हवामान सारांश /इशारा

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | **प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार ठाणे जिल्ह्यात पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहून दिनांक २१ ते २५ एप्रिल, २०२१ दरम्यान कमाल आणि किमान तापमानात वाढ संभवते तसेच आकाश ढगाळ राहील.** |
| **विस्तारित श्रेणी अंदाज** | **विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक २३ ते २९ एप्रिल, २०२१ दरम्यान पाऊस सरासरी इतका, कमाल तापमान सरासरीपेक्षा जास्त आणि किमान तापमान सरासरी ते सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.** |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| **पिक** | **अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **सामान्य सल्ला** | -- | • कोरोना विषाणूचा संसर्ग प्रतिबंधित करण्यासाठी शेतीतील कामे करताना स्वच्छता व सुरक्षिततेच्या खबरदारीच्या उपाययोजनांचे पालन करावे.<br>• शेतीतील सर्व कामे करताना शेतकऱ्यांनी / शेतमजुरांनी तोंडाला मास्क लावावे तसेच एकमेकांमध्ये ४-६ फुट अंतर राहील याची दक्षता घ्यावी. ठराविक वेळाने साबणाने हात स्वच्छ धुवावेत.<br>• जेवताना, विश्रांती घेताना, शेतमाल गाडीत भरताना तसेच उतरवताना तसेच शेतात काम करतांना कामगारांची जास्त गर्दी होणार नाही याची काळजी घ्यावी.<br>• कोविड -१९ चा संसर्ग आढळून आलेल्या भागामध्ये शक्यतो शेतीमध्ये यंत्राचा वापर केल्यानंतर यंत्रे निर्जंतुक करून ठेवावी.<br>• पिक संरक्षण व पोषक अन्नद्रव्यासंदर्भात फवारणी करताना उपकरणे हाताळणे, द्रावण तयार करणे, फवारणी करणे व उपकरणे धुवून ठेवणे याविषयी पुरेशी खबरदारी घ्यावी.<br>• शेतीसाठी आवश्यक खरेदी आणि विक्री करताना शासनाने नेमून दिलेल्या नियमांचे |

| | | |
|---|---|---|
| | | पालन करावे. |
| **विशेष सल्ला** | -- | • खरीप हंगामाच्या पिक लागवडीसाठी पूर्वतयारी म्हणून जमिनीची खोल नांगरणी करून जमीन १५ ते २० दिवस उन्हात तापून द्यावी जेणेकरून किड, रोगाच्या सुप्तावस्था नष्ट करण्यास मदत होईल. |
| **आंबा** | फळधारणा | • ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असल्याने मोठ्या आकाराच्या **आंबा फळांवर फळमाशीचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने बागेमधील गळलेली फळे गोळा करून नष्ट करावीत आणि आंबा फळांचे फळमाशी पासून संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले "**रक्षक फळमाशी सापळा**" प्रती एकरी २ या प्रमाणात बागेमध्ये झाडांच्या उंचीप्रमाणे साधारण जमिनीपासून २ ते ३ मीटर उंचीवर राहील अशा प्रकारे टांगावा.<br>• **गोटी ते अंडाकृती आकाराच्या** आंबा फळांवर डॉ.बा.सा.कों.कृ.विद्यापीठाने दिलेल्या शिफारशी नुसार फळगळ कमी करण्यासाठी, फळाचा आकार व वजन वाढून **डाग विरहीत फळांसाठी आणि फळमाशीपासून तसेच प्रखर सूर्यकिरणापासून संरक्षण** करण्यासाठी **२५ x २० सें.मी. आकाराची कागदी पिशवी लावावी.** आवरण घालताना फळाच्या देठाकडे इजा होणार नाही याची काळजी घ्यावी.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पहिल्या वर्षी आठवडयातून दोन वेळा तर दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसातून दोन वेळा व तिसऱ्या वर्षी महिन्यातून दोन वेळा प्रत्येक कलमांना ३० लिटर पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच झाडाच्या आळ्यामध्ये गवताचे आच्छादन करावे. |
| **नारळ** | फळधारणा | • नारळ नवीन लागवडीसाठी जमीन किमान एक मीटर खोलीपर्यंत कसदार, भुसभुशीत आणि पाण्याचा निचरा होणारी असावी.<br>• नारळावरील इरीओफाईड कोळीच्या प्रादुर्भावामुळे फळाच्या देठाखालच्या भागात पांढरट, पिवळे, त्रिकोणी चट्टे दिसून येतात. प्रादुर्भित भागावरील फळांचे आवरण तडकते परिणामी नारळ लहान राहतात तसेच लहान फळांची गळ होते. या किडीच्या प्रभावी व्यवस्थापनेसाठी नारळ बागेत स्वच्छता ठेवावी नारळाच्या आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे तसेच ५ टक्के कडूनिंबयुक्त (अझाडीराक्टीन) कीटकनाशक ७.५ मि.ली. अधिक ७.५ मि.ली. पाणी मिसळून वर्षातून तीन वेळा (ऑक्टोबर ते नोव्हेंबर, जानेवारी ते फेब्रुवारी आणि एप्रिल ते मे) मुळाद्वारे द्यावे. औषध दिल्यानंतर ४५ दिवसापर्यंत नारळ काढू नयेत. याशिवाय नारळावर १ टक्का कडुनिंबयुक्त कीटकनाशक (निमाझोल) ४ मि.ली. प्रती लिटर पाण्यातून नारळाच्या घडावर पडेल अशी फवारणी करावी. फवारणी करण्यापूर्वी सर्व किडग्रस्त व तयार नारळ काढून घ्यावेत. पडलेले फळे, फुलोरा गोळा करून नष्ट करावेत.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या नारळ बागेत तीन ते चार वर्षे वयापर्यंतच्या माडाना ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून रोपांना वरून सावली करावी. |
| **चिकू** | फळधारणा | • तापमानात वाढ संभवत असल्याने चिकू बागेस ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. झाडाच्या आळ्यामध्ये गवताचे आच्छादन करावे. |
| **भाजीपाला पिके** | फळधारणा | • तापमानात वाढ संभवत असल्याने भाजीपाला पिकाला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **माती परीक्षण** | -- | • सर्वसाधारणपणे माती परीक्षण दर तीन ते चार वर्षातून एकदा खरीप पिक काढणी नंतर लगेच किंवा एप्रिल-मे महिन्यामध्ये करणे आवश्यक आहे परंतु वर्षातून दोन ते तीन वेळा पिके घेत असलेल्या जमिनीचे माती परीक्षण दरवर्षी करणे जरुरीचे आहे. हंगामी पिके भात, नागली, भुईमुग पिकांकरिता २० ते २५ से.मी. आणि फळबाग पिके आंबा, काजू, नारळ सुपारी करिता ६० से.मी. खोलीवरचे मातीचे नमुने घ्यावेत. |

| | | |
|---|---|---|
| **पशुधन** | -- | • तापमानात वाढ संभवत असल्याने जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे. तसेच उष्णतेचा ताण कमी करण्यासाठी वैरणीवर १ टक्के गुळपाणी आणि ०.५ टक्के मीठ यांचे स्वतंत्र द्रावण करून शिंपडावे.<br>• उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण करण्याकरिता दुपारच्या वेळी जनावरांच्या अंगावर थंड पाणी शिंपडावे त्यामुळे शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होईल.<br>• जनावरांना फऱ्या रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने सर्वजनावरांना लसीकरण करून घ्यावे |
| **कुकुटपालन** | -- | • तापमानात वाढ संभवत असल्याने कुकुटपालन शेड मध्ये पाण्याची भांडी वाढवावी व पिण्यासाठी स्वच्छ आणि थंड पाण्याची मुबलक प्रमाणात देण्यात यावे.<br>• कोंबड्यावरील राणीखेत रोगावर पशुवैद्यकीय अधिकारी सल्ल्याने लसीकरण करून घ्यावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.

अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.